# मुकुल माधव फौंडेशनकडून ५० कॉन्सेंट्रेटर्स

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : मुकुल माधव फौंडेशन आणि पुणे येथील फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडने कोल्हापूर जिल्हा प्रशासनाला ५० ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर्सची मदत केली आहे.

जिल्ह्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. कोरोनाबाधित रुग्णांसाठी सध्या व्हेंटिलेटर आणि ऑक्सिजनची आवश्यकता भासत आहे. ते लक्षात घेऊन आणि जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सीएसआर सहयोगी मुकुल माधव फौंडेशनने कोल्हापूर जिल्ह्याला ५० ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर्सची मदत केली. फौंडेशनने ही ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर्स पालकमंत्री सतेज पाटील आणि जिल्हाधिकारी देसाई यांच्याकडे सुपूर्द केली.

देशातील सर्वांत मोठ्या पीव्हीसी पाईप, फिटिंगचे उत्पादक असलेल्या फिनोलेक्स पाईप्सची मुकुल माधव फौंडेशन ही सीएसआर धर्मादाय संस्था ही आरोग्य, शिक्षण, जलसंधारण, समाजकल्याण या क्षेत्रात कार्यरत आहे. फौंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्तपदाची जबाबदारी रितू छाब्रिया सांभाळत आहेत, असे फिनोलेक्स पाईप्सचे अतुल गबाळे यांनी सांगितले.

यावेळी महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, माजी उपमहापौर संजय मोहिते, फिनोलेक्स पाईप्सचे वैभव कुलकर्णी, वितरक विनय नलवडे, प्रवीण क्षीरसागर, जयंती पटेल, मनीषा पटेल, आदी उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 3 Jun 14, 2021



मुकुल माधव फौंडेशन आणि पुणे येथील फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडने पालकमंत्री सतेज पाटील आणि जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्याकडे ५० ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर्स सुपूर्द केले. यावेळी शेजारी फिनोलेक्स पाईप्सचे अतुल गबाळे, महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, माजी उपमहापौर संजय मोहिते, आदी उपस्थित होते.